# ३. वाहतूक नियंत्रणाचे इशारे

**उद्दिष्टे**

(१) वाहतूक समस्येविषयी जाणीव निर्माण करणे.

(२) वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची मानसिकता निर्माण करणे.

(३) वाहतूक नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या इशाऱ्यांची माहिती होणे.

(४) रस्त्यावरील वाहतुकसंबंधी फलक व खुणा यांचे अर्थ समजून घेणे.

## वाहतूक नियंत्रणाचे इशारे

आजच्या यांत्रिक युगात अत्यंत वेगवान अशी वाहतुकीची साधने उपलब्ध झाली आहेत. गुंतागुंतीच्या गतिमान जनजीवनात वाहतुकीस उधाण आले आहे. प्रत्येकाला आपल्या कामाची घाई झाली आहे. अशा स्थितीत रस्त्यावरील रहदारी नागरिक सुरक्षिततेसाठी अधिकाधिक सुनियंत्रित करणे आवश्यक आहे.

हे नियंत्रण वाढती लोकसंख्या, वाढती वाहने व जुने अरुंद रस्ते या परस्पर मारक गोष्टींमुळे अशक्य होऊन बसले आहे. 'रस्ते जुनेच पण वाहने नवीन' 'मार्ग मोजके पण वाहने अमाप' अशी अवघड अवस्था होऊन बसली आहे. पादचारी, सायकल स्वार, बैलगाड्या, ऑटोरिक्षा, स्कूटर्स, मोटार, बसेस आणि ट्रक यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. या वाहतुकीला शिस्तीअभावी अनेक अडथळे निर्माण झालेले दिसतात आणि मोठ्या प्रमाणावर अपघात घडून जीवित आणि वित्तहानी झालेली अनुभवास येते. यामुळे वाहतुकीचे नियम सर्वांनी योग्य रितीने पाळणे हे महत्त्वाचे झाले आहे.

वाहतुकीचे संकेत देण्यासाठी पूर्वी शिपाई उभे केले जायचे. आजही ट्रॅफिक पोलीस हे काम करताना दिसतात. १९२० मध्ये वाहतुकीच्या स्वयंचलित चिन्हांचा प्रयोग करण्यात आला. १९९७ मध्ये यंत्रातील चिन्हांचा दिवा पाहून चालकाला गाडी नेण्यासाठी दिशा माहीत होत असे. विकसित देशांमध्ये यासाठी ध्वनी संकेतकांचा वापर होतो.







## ट्रॅफिक पोलिसांद्वारे वाहतुकीचे इशारे



**इशारा क्र.१ –** डावा हात जमिनीस समांतर असावा. हात खांद्याच्या सरळ रेषेत घेऊन ९०°च्या कोनात ठेवावा. हा इशारा मागील बाजूने येणारी वाहतूक थांबवण्यासाठी करतात. हाताचा पंजा पुढील बाजूला उघडलेला असावा. उजवा हात मांडीलगत ठेवावा.



**इशारा क्र. २ –** समोरून येणारी वाहतूक थांबवण्यासाठी उजवा हात समोरच्या बाजूस उंचावलेला, समोरच्या रहदारीस सहज दिसेल अशा रीतीने असावा, हाताचा पंजा उघडा व बोटे जुळलेली असावीत.



**इशारा क्र. ३ –** मागून व समोरून येणारी वाहतूक एकाच वेळी थांबवण्यासाठी इशारा क्र. (१) व इशारा क्र. (२) मध्ये केलेली कृती एकत्र केल्यानंतर इशारा क्र. (३) तयार होतो.



**इशारा क्र. ४ (अ) –** डाव्या बाजूने येऊन उजवीकडे वळणारी वाहतूक थांबवण्यासाठी डावा हात इशारा क्र. (१) मध्ये दाखवल्याप्रमाणे जमिनीला समांतर ठेवावा. पंजा समोर असावा. नजर समोर असावी. उजवा हात थोडा पुढच्या बाजूस झुकवून त्याचा पंजा रस्त्याच्या बाजूला उघडलेला असावा.

**इशारा क्र.४ (ब) –** उजवीकडील वाहतूक थांबवून डाव्या बाजूच्या वाहतुकीस उजवीकडे वळवण्यासाठी इशारा क्र. (२) मध्ये दाखवल्याप्रमाणे उजवा हात वर परंतु थोडा बाजूला झुकलेला आणि त्या हाताचा पंजा उजव्या बाजूच्या दिशेने उघडलेला असावा. डावा हात इशारा क्र. (१) प्रमाणेच डाव्या बाजूस असावा.





**इशारा क्र. ५ –** डावीकडील वाहतूक थांबवून उजव्या बाजूच्या वाहतुकीस उजवीकडे वळवण्यासाठी आपला उजवा हात खांद्यापासून सरळ किंवा किंचित वर आकाशाकडे न्यावा. हाताचा पंजा ताठ, समोर उघडलेला असावा. बोटे एकमेकांना चिकटलेली असावीत. समोरून येणाऱ्या वाहनांच्या बाजूस नजर ठेवावी.

आपला डावा हात खांद्यापासून सरळ, डाव्या बाजूस किंचित वर आकाशाकडे न्यावा. हाताचा पंजा मनगटापासून सरळ वरील बाजूस वळवावा, डावीकडून येणाऱ्या वाहनांकडे पंजा असावा.

**इशारा क्र. ६ –** सर्व बाजूंची वाहतूक थांबवण्यासाठी (सिग्नल बदल करण्यासाठी) आपले दोन्ही हात खांद्याच्या रेषेत घ्यावे. उजवा हात उजवीकडे, डावा हात डावीकडे खांद्यापासून सरळ रेषेत व किंचित आकाशाकडे न्यावेत. कोपरात दोन्ही हात थोडेसे वाकलेले असावेत. दोन्ही हातांचे पंजे ताठ व उजव्या, डाव्या बाजूकडून येणाऱ्या वाहनांकडे वळवावेत.





**इशारा क्र. ७ –** वाहतूक नियंत्रकाच्या -डाव्या बाजूकडून येणारी वाहतूक बोलावण्यासाठी असा इशारा करतात. उजवा हात समोर खांद्यापासून सरळ रेषेत किंचित वर आकाशाकडे इशारा क्र. (२) प्रमाणे आणि पंजा समोरील बाजूकडे न्यावा. पोलीस प्रथम आपल्या समोरील व पाठीमागील वाहतूक थांबवण्यासाठी इशारा करतो. इशारा क्र. (३) प्रमाणे नंतर आपल्या डाव्या बाजूकडून येणाऱ्या वाहनांकडे आपला चेहरा वळवतो नंतर डावीकडे डावा हात कोपरात वाकवून डोक्याच्या वर व खांद्याच्या बाजूस वळवून डावीकडील वाहतुकीस बोलावतो.

**इशारा क्र. ८ –** उजवीकडून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यासाठी डावा हात डाव्या बाजूस सरळ ताठ ठेवून खांद्याचा रेषेत नेऊन इशारा क्र.(१) प्रमाणे कृती करावी. उजवा हात उजव्या बाजूस पंजा सरळ करून न्यावा. नजर समोर असावी. हात वाकवून डोक्यावर, खांद्याजवळ न्यावा, बोटे ताठ, उजवीकडील वाहनांस बोलावण्यासाठी मान उजवीकडे, नजर उजवीकडे वळलेली असावी.






**इशारा क्र. ९ –** समोरून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यासाठी इशारा देताना उजवा हात कोपराशी वाकवून डोक्यापर्यंत न्यावा, तळहाताची मागची बाजू समोरच्या वाहनांना दिसेल अशा रीतीने पुन:पुन्हा हात हालवून इशारा द्यावा.

## वाहतुक नियंत्रणाचे स्वयंचलित विद्युत इशारे

आकृतीत दाखवल्याप्रमाणे लाल, पिवळा, हिरवा दिवा व दिशादर्शक बाण यांच्या साहाय्याने वाहतूक नियंत्रित केली जाते.



**लाल दिवा:** लाल दिव्याचा अर्थ थांबा. वाहने थांबवण्याच्या रेषेच्या मागे थांबा.

**पिवळा किंवा नारिंगी दिवा:** पिवळसर किंवा नारिंगी दिवा यांचाही अर्थ थांबा (सावधान). हिरवा दिवा लागेपर्यंत मध्ये घुसू नका किंवा वाहन सुरू करू नका.

**हिरवा दिवा:** हिरवा दिवा याचा अर्थ जा. सुधारित स्वयंचलित दिव्यामध्येही लाल, पिवळा, हिरवा या तीन ही दिव्यांचा अर्थ अनुक्रमे थांबा, सावधान (पहा), जा असाच आहे.

### दिशादर्शक बाणांच्या साहाय्याने वाहतूक नियंत्रण

१) **सरळ जाणारा बाण :** चौकातून सरळ जाणारे वाहनचालक हे आपल्या वाहनासह रस्त्याच्या मध्ये थांबतील व दिव्याच्या सरळ बाणाचा ↑ इशारा मिळताच सरळ जातील.




२) **उजवीकडे जाणारा बाण :** वाहन चालकास आपल्या वाहनासहित रस्त्याच्या उजवीकडे वळून जायचे असल्यास तो रस्त्याच्या उजव्या बाजूस थांबेल व दिव्याच्या बाणाचा इशारा → होताच उजव्या बाजूने जाईल.



३) **डावीकडे जाणारा बाण :** वाहन चालकास आपल्या वाहनासहित रस्त्याच्या डावीकडे वळून जायचे असल्यास तो रस्त्याच्या डाव्या बाजूस थांबेल व दिव्याचा बाणाचा इशारा ← होताच डाव्या बाजूने जाईल.

४) **सतत लुकलुकणारा लाल दिवा :** आपले वाहन थांबवून प्रथम वाहतुकीमधील वाहने व पादचारी यांना जाण्यास प्राधान्य द्यावे.



५) **सतत लुकलुकणारा पिवळा दिवा :** वेग कमी करून काळजीपूर्वक पुढे जावे.

## रस्त्यावरील रहदारीच्या खुणा

१) **अभय आयलंड (Island) :** चौकाच्या मधोमध असलेल्या गोल कारंजे, चबुतरा यांना प्रदक्षिणा घालून वाहने जातात त्यामुळे अपघात टाळता येतात.

२) **पादचारी मार्ग (Footpaths) :** रस्त्याच्या दोन्ही बाजूंची थोडी उंच जागा ज्यावरून पादचारी ये-जा करतात.

३) **रस्ता ओलांडण्यापूर्वी पुढील बाबी लक्षात घ्या व त्यानुसार वागा.**


अ) रस्ता ओलांडण्यापूर्वी थांबा, प्रथम उजवीकडे पहा व नंतर डावीकडे पहा.

ब) रस्ता ओलांडताना थांबा, पहा व जा या पद्धतीचा वापर करा.


क) एकेरी वाहतुकीचे रस्ते ओलांडण्यापूर्वी ज्या दिशेने वाहने येत असतील तिकडे लक्ष ठेवा. रस्ता मोकळा असल्यावर तो रस्ता पार करा.

ड) रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक असेल तर तेव्हाही प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे पाहून दुभाजकापर्यंत जा व नंतर पुढेही प्रथम उजवीकडे पहा नंतर डावीकडे पहा, परत उजवीकडे पहा व रस्ता मोकळा असल्यावर पुढे जा.


**रस्त्याच्या पृष्ठभागावरील खुणा : (Road surface marking) तीन मार्ग आखणी.**




१) **मार्ग रेषा :**
रस्ता मोकळा असेल तरच पुढे जाऊ शकता.



२) **मध्य रेषा :**
पुढील वाहन ओलांडून जाण्यास परवानगी आहे.








**३) इशारा रेषा :**
रस्ता मोकळा असेल तर पुढील वाहन ओलांडून जाऊ शकता.


**४) इतर वाहनासाठी वाट :**
इतर वाहनांसाठी वाट द्या असा इशारा मिळतो.

**५) पादचारी ओलांडणी :**
पहिल्या पांढऱ्या रेषेपूर्वी थांबा.

## दिशादर्शक चिन्ह



डावीकडे व सरळ पुढे     उजवीकडे व सरळ पुढे



डावीकडे     सरळ     उजवीकडे


## रस्ता विभाजक (Road Divider)

अ) रस्त्याच्या मध्यभागावरील तुटक – तुटक पांढऱ्या रेषेमुळे रस्त्याचे विभाजन होते अशा रस्त्यावर ओव्हरटेक करता येते व पुढील वाहनापुढे जाता येते.

ब) रस्त्याच्या मध्यभागी अखंड पांढरी रेषा असेल तर ओव्हरटेक करण्यास प्रतिबंध आहे.


क) रस्त्याच्या मध्यभागी एक सरळ रेषा व एक तुटक तुटक रेषा असेल तर, तुटक रेषा असते त्या बाजूने ओव्हरटेक करता येते.

ड) रस्त्याच्या मध्यभागी दोन पांढऱ्या सलग रेषा असतील तर ओव्हरटेक करण्यास अजिबात परवानगी नाही. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी करण्यास सक्त मनाई असते.







**रस्ता विभाजकाचे प्रकार**



रेषा



स्टोन



चॅनेलायझर

## १) झेब्रा क्रॉसिंग



रस्ता ओलांडण्यासाठी रस्त्यावर पांढऱ्या रंगाचे समांतर पट्टे मारलेले असतात. त्यांना 'झेब्रा क्रॉसिंग' म्हणतात.

वाहन थांबवण्याची गरज भासल्यास झेब्रा क्रॉसिंगच्या अगोदर वाहन थांबवा. अन्यथा रस्ता क्रॉस करणाऱ्या लोकांना वाहनाचा धक्का लागण्याचा संभव असतो. फूटपाथ नसलेल्या रस्त्यावरून चालताना पादचाऱ्यांनी उजव्या बाजूने चालावे.




## २) गिव्ह वे लाईन

मुख्य रस्त्यास मिळणाऱ्या रस्त्यांवर दोन खंडित समांतर रेषा मारलेल्या असतात. छोट्या रस्त्यावरील वाहनांनी त्या रेषेच्या अलीकडे थांबून मुख्य रस्त्यावरील वाहनांना प्रथम जाऊ द्यावे.

## ३) रोड मार्किंग अलाँग द रोड


### रस्त्याच्या बाजूस खुणा व चिन्हे :

**(पेलिकन क्रॉसिंग, स्तंभदुभाजक)**




रस्त्याच्या बाजूने सामान्यपणे सदरच्या खुणा असतात. रस्ता दुभाजक किंवा वाहतुकीच्या दिशेनुसार विभागणी करणाऱ्या खुणा बऱ्याच वेळा दिसतात. मोठ्या शहरात रस्ता दुभाजक हे रोलिंग, लोखंडी बार, सिमेंट कट्टा, वीट इत्यादी स्वरूपातसुद्धा असतात.

## ४) वाहन ओलांडून पुढे जाण्यास परवानगी




दुहेरी मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी (दुभाजक लाईन) पांढऱ्या रंगाची खंडित रेषा असते तेथे पुढील वाहनास ओलांडून जाण्यास परवानगी नसते. (दोन्ही दिशांकडून येणाऱ्या वाहनास)

## ५) वाहन ओलांडून जाण्यास एकाच बाजूने परवानगी




जेव्हा दुहेरी मार्गातील दुभाजक मध्य रेषा पांढरी व खंडित रेषा संपून पुढे सलग पांढरी रेषा (पट्टा) सुरू होते, त्या सलग रेषेवरून दोन्हीही बाजूकडून जाणाऱ्या वाहनांना त्यांच्या पुढच्या वाहनास ओलांडून जाण्यास परवानगी असते. जेव्हा रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक म्हणून एक सरळ पांढरी रेषा (पट्टा) व शेजारीच दुसरी समांतर परंतु तुटक/खंडित पांढरी रेषा असते. तेथे तुटक रेषा ज्या लेनमध्ये आहे, त्या लेन L मधील वाहने आपल्या पुढील वाहनास ओलांडून (ओव्हरटेक) पुढे जाऊ शकतात. परंतु सलग पांढरी रेषा असलेल्या R लेन मधील वाहनास ओव्हरटेकिंग करण्यास मनाई आहे.


## ६) दोन्ही बाजूकडून येणाऱ्या वाहनांना ओलांडून जाण्यास मनाई





दुहेरी मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी दोन समांतर सलग पांढऱ्या रंगाच्या रेषा (पट्टे) शेजारी दुभाजक म्हणून असतात. तेथे दोन्हीही लेन मधील वाहनांना आपल्या पुढील वाहनास ओलांडून जाण्यास मनाई केलेली असते. (ओव्हरटेक करता येणार नाही.)

### ७) लेन डिव्हायडर्स

रस्ता दुभाजक : रस्ता दुभाजक म्हणून खंडित पांढऱ्या रंगाची रेषा(पट्टा) रस्त्याचे दोन पेक्षा जास्त तीन चार लेन तयार करतात. अशा ठिकाणी वाहन चालकाने योग्य ती खबरदारी घ्यावी. योग्य ते इशारा सिग्नल दिल्यानंतर ओव्हरटेकिंग करण्यास परवानगी असते. मात्र नागमोडी वाहन चालवणे अत्यंत धोकादायक असते. तिसरी लेन ओव्हरटेकिंगसाठी असते.







### ८) खास बस / सायकल व ऑटो लेन

सलग पिवळ्या रंगाची रेषा मारून इतर लेनपासून वेगळी लेन दर्शवलेली असते तेथे इतर वाहनास जाण्याची मनाई असते. विशिष्ट वाहनांना जाण्यासाठीच ती लेन असते.

### ९) नो पार्किंग

रस्त्याच्या एका बाजूस जिथे सलग पिवळ्या रंगाची रेषा(पट्टा) सलग रस्त्यास समांतर असते तेथे वाहने उभी करण्यास मनाई असते. मालाची / प्रवाशांची चढ उतार करण्यास त्या बाजूस तात्पुरते वाहन उभे करण्यास परवानगी असते. (पार्किंगसाठी नाही.)






### १०) वाहन थांबवण्यास परवानगी नाही

रस्त्याच्या एका बाजूस रस्त्याला समांतर पिवळ्या रंगाच्या दोन समांतर रेषा (पट्टा) असतात त्या ठिकाणी कोणत्याही वाहनास सर्व काळ थांबवण्यास किंवा उभे करण्यास परवानगी नसते. तसेच प्रवाशांची किंवा मालाची चढ उतार करण्यास मनाई असते.

### ११) बॉक्स जंक्शन



पिवळ्या रंगाच्या एकमेकींस छेदणाऱ्या तिरक्या रेषांचे सदरचे चिन्ह मोठ्या चौकात असते. मोठा चौक किंवा दोन महामार्ग एकत्र येतात त्या ठिकाणी सदरचे चिन्ह असते. येथे स्वयंचलित विद्युत दिवे किंवा पोलिसाद्वारे वाहतूक नियंत्रण केले जाते. सदरच्या ठिकाणी खूप रहदारी असते. तेथे हे चिन्ह स्वच्छ दिसेल असे ठेवावे लागते. कोणत्याही परिस्थितीत सदरच्या बॉक्समध्ये आपले वाहन थांबवू नये.



### १२) पेलिकन क्रॉसिंग

पिवळ्या रंगाचे ठोकळे रस्त्यात ठोकलेले असतात. रात्रीच्या वेळी लांबवरून हे दिसू शकतात.

### १३) स्तंभ रस्ता दुभाजक



रस्त्याच्या मधोमध लोखंडाचे लाल व पिवळा रंग असलेले खांब (बोलार्ड) लावलेले असतात.

**रस्ता कोठे ओलांडू नये याचे नियम**

अ) उभ्या असलेल्या वाहनाच्या मागून धावत जाऊन रस्ता ओलांडू नये.

आ) वाहतूक चालू असताना धावत रस्ता ओलांडू नये.

इ) वाहन व वाहतूक न दिसणाऱ्या असुरक्षित ठिकाणांपासून रस्ता ओलांडू नये.

ई) अतिवाहतूक असताना रस्ता ओलांडू नये.

उ) रस्ता दुभाजकावरून उडी मारून रस्ता ओलांडू नये.

## १४) उड्डाण पूल (overbridge)

वेगवान व गर्दीची वाहतूक असणाऱ्या रस्त्यांवर दूर जाणाऱ्या वाहनासांठी पुलावरून जो मार्ग असतो त्याला ‘उड्डाण पूल’ म्हणतात.







## १५) फुटब्रीज

मोठ्या प्रमाणात वाहतूक असणाऱ्या रस्त्यांवरील पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी बांधलेले पूल म्हणजे ‘फुटब्रीज’.

## १६) सब वे

अ) ज्या रस्त्यांवर काही बांधकाम वा अन्य कारणामुळे वाहने जाऊ शकत नाहीत तेव्हा तात्पुरता पर्यायी रस्ता तयार केला जातो.

आ) गावातून एखादा रस्ता जातो तेव्हा रहदारीमुळे अपघात होऊ नये म्हणून गावाबाहेरून कायमचा रस्ता (पर्यायी) केला जातो.






## १७) पायी जाताना

रस्त्यावर फुटपाथ असल्यास रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे. फुटपाथ नसल्यास रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे म्हणजे समोरून येणारे वाहन दिसेल व अपघातापासून आपण वाचू शकू. लहान मुले सोबत असल्यास त्यांना आपल्या डाव्या बाजूस घेऊन त्यांचा हात घट्ट धरावा. रात्रीच्या वेळी सहज दिसू शकतील असे पोशाख वापरावेत. गप्पा मारत, खेळत, घोळक्याने चालू नये. झेब्रा क्रॉसिंगचा वापर करावा. वाहनातून उतरताना डाव्या बाजूने उतरावे. चालत्या वाहनांमध्ये चढू अथवा उतरू नये.

## १८) सायकल / मोटारसायकल चालवताना


आपली सायकल/मोटारसायकल सुस्थितीत ठेवा. रात्रीच्या वेळी वाहनाच्या दिव्याचा प्रकाश पांढरा, स्थिर, स्वच्छ असावा. डावे/उजवे वळण घेताना हाताने स्पष्ट इशारे दाखवावा. दोनपेक्षा अधिक सायकली एका रांगेत चालवू नाही. रस्त्याच्या डाव्या कडेने वाहन चालवावे. चौकात आल्यावर सावधगिरीने वागावे. आधीच वळणाचा इशारा द्यावा. अपघात प्रतिबंधक साधनांचा वापर करावा. वेग कमी ठेवावा. शॉर्टकट घेऊ नये. पार्किंगच्या ठिकाणीच सायकल ठेवावी. सायकल/मोटारसायकलवरून गप्पा मारत जाऊ नये. वाहन हे खेळण्याचे साधन नाही हे नेहमी लक्षात ठेवावे.





**चौक : प्रकार व नियंत्रण : चौकाचे प्रकार**



१) **सिंगल पॉईंट चौक :** एक पोलीस या ठिकाणी उभा राहून वाहतूक नियंत्रण करतो.




**२) डबल पॉईंट चौक :** या चौकात समोरासमोर दोन पोलीस उभे राहून वाहनांचे नियंत्रण करतात. हा चौक मोठा असतो. येथे वाहतूक जास्त असते.



**३) सेंटर पॉईंट चौक :** या चौकात मध्यभागी एक पोलीस थांबून वाहनांचे नियंत्रण करतो. इशारा नंबर ८ चा उपयोग या चौकात होतो.



**४) टी पॉईंट चौक :** या चौकात दर्शवलेल्या ठिकाणी एक पोलीस थांबून वाहतूक नियंत्रण करतो.




**५) वाय पॉईंट चौक :** एका रस्त्यापासून दोन दिशांना दोन रस्ते जातात अथवा दोन तिरकस बाजूंनी रस्ते येऊन एका ठिकाणी मिळतात व त्यापुढे एकच रस्ता असतो. एक पोलीस थांबून वाहतूक नियंत्रण करतो.



# प्रात्यक्षिक

## आदर्श चौक

विद्यार्थ्यांना बस, कार, सायकलस्वार व पादचारी यांच्या भूमिका वठवण्यास सांगावे. ही मानवी वाहने चौकातून जाताना वळणावर हाताने इशारे देतील, पादचारी फक्त चालतील. चुका होणाऱ्यांचे अपघात झालेच तर का झाले? याची उत्तरे विद्यार्थ्यांकडून घ्यावीत.




1. डावीकडे जाणारी वाहने.
2. समोर जाणारी वाहने.
3. उजवीकडे जाणारी वाहने.
4. वाहतूक नियंत्रक
5. फूटपाथ
6. सुरक्षित क्षेत्र (आयलँड)
7. झेब्राक्रॉसिंग
8. रोड डिव्हायडर

### रस्ता सुरक्षा व नागरी संरक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर

स्वयंचलित विद्युत, सोलर इशाऱ्याचे दिवे, सिग्नल तोडू नये म्हणून CCTV कॅमेरा लावणे. आज लोक इंटरनेट वापरतात. इंटरनेटद्वारे कोठे ट्रॅफिक जास्त झाली हे समजते व एखाद्याने सिग्नल तोडला तर ई-चलनाद्वारे आर्थिक व्यवहार केले जातात. झेब्रा क्रॉसिंगच्या थोडे पुढे गेल्यास सेन्सरच्या माध्यमातून गाडीच्या नंबरची नोंद होते.

**अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळांना भेट द्या.**

1. https//vahan.nic.in
2. www.cirtindia.com
3. https://parivahan.gov.in
4. https://transport.maharashtra.gov.in/

## मूल्यमापन

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधान कारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीचे इशारे | एक ते नऊ प्रकारच्या इशाऱ्यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. | काही इशारे समजले. काही इशारे समजले नाहीत. | वाहतुकीच्या इशाऱ्यांचे अर्थ न समजता इशारे करण्याचा प्रयत्न केला. | |
| स्वयंचलित विद्युत इशारे | लाल, पिवळ्या, हिरव्या, दिव्यांचा अर्थ सांगितला, दिशादर्शक बाणांचा अर्थ समजून घेतला. | स्वयंचलित विद्युत इशाऱ्यानुसार क्रिया केल्या. | कधी कधी सिग्नलच्या नियमांचे उल्लंघन करतो. | |
| रस्त्यावरील दिशादर्शक चिन्हे | रस्त्यावरील दिशा दाखवणारी चिन्हे ओळखून त्याप्रमाणे वर्तन केले. | रस्त्यावरील काही खुणा ओळखून अर्थ सांगितले. | रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या खुणाचे महत्त्व सांगितले. पण कधीकधी गोंधळ झाला. | |
| आदर्श चौक | बस, कार, मोटारसायकल, सायकल, इ. वाहनांची भूमिका चांगल्या प्रकारे केली. | इशाऱ्यानुसार कृती करतो. चुका झाल्यास चुका सुधारल्या. | मनोरंजनात्मक खेळाद्वारे आदर्श चौकात वाहनाच्या माध्यमातून अचूक क्रिया करताना बऱ्याच चुका केल्या. | |

***

## माझा अभ्यास

१. स्वयंचलित विद्युत दिव्याचे रंग कोणता अर्थ दर्शवतात त्याची माहिती लिहा.

२. रस्ता विभाजकाच्या प्रकारांची आकृतीसह माहिती लिहा.

३. ‘आदर्श चौक’ आकृती काढून वाहतुकीचे मार्ग दाखवा.